# जखम

पुन्हा मोगऱ्याची धुंद साद आली
पुन्हा आठवांची मनी जखम ओली

न बोलता कुणाशी, कुणी ऐकताहे,
जपावे कसे ते, गुपित उघड आहे,
सुक्या पाकळ्यांची, अशी हि अबोली
पुन्हा आठवांची मनी जखम ओली

नि:शब्द वारा तरी हि, सुवास आसमंती,
ओठी कळ्या परंतु निष्पर्ण पारीजाती,
कळले कसे न फुलले, अनुरक्त गुज गाली
पुन्हा आठवांची मनी जखम ओली

का जन्म हा असावा, शाप भोगण्याचा
श्वासात गुंतलेला तरी, उःशाप मोगऱ्याचा
नाकारली परंतु, हळू ओंजळीत आली
पुन्हा आठवांची मनी जखम ओली
पुन्हा मोगऱ्याची धुंद साद आली.

**----संध्या रानडे**